ता.२६/०२/२०१९

# प्रेसनोट

येरवडा कारागृहातून शिक्षा भोगून बाहेर पडलेला अट्टल चोरटा पुन्हा खडक पोलीसांनी जेर बंद केला

दिनांक २३/०२/२०१९ रोजी खडक पोलीस ठाणेकडील सहा.पो.निरी.उमाजी राठोड व कर्मचारी संदीप कांबळे,विशाल जाधव ,समीर माळवदकर असे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना पुर्व रेकॉर्ड वरील आरोपी विशाल संजय मते वय २८ वर्ष रा.मु.पो.खडकवासला,भाजीमंडई ,पैलवानवाडी,जिल्हा पुणे हा कस्तुरे चौकाचे दिशेने जात असल्याचे दिसल्याने त्यास हटकले असता तो पळून जाऊ लागल्याने चौकात गस्तीसाठी उभ्या असलेल्या खडक पोलीस ठाणेकडील सीआर मोबाईल वरील कर्मचारी अमोल पाटेकर,बलतू घाडगे , श्रीखंडे यांचे मदतीने त्यास जागीच ताब्यात घेतले त्याचे अंगझडतीमध्ये मागील वर्षी कस्तुरे चौकात एका घरामध्ये झालेल्या चोरीच्या गुन्ह्यातील चोरीस गेला किं.रू.५,०००/- चा एक वन प्लस कंपनीचा मोबाईल हॅण्डसेट व रात्रीचे वेळेस प्यासा हॉटेल मंडई समोरील सार्व.शौचालय येथे लघु शंकेसाठी गेलेल्या इसमाचा चोरीस गेला किं.रू.१०,०००/- एक होनर कंपनीचा मोबाईल हॅण्डसेट जप्त करण्यात आल्याने त्यास अटक करण्यात आली असून त्याचेकडून खडक पो.स्टे.गु.र.नं.३९४/१८,भादवि कलम ३८० व गु.र.नं.४०८/१८,भादवि कलम ३७९ असे दोन गुन्हे उघडकीस आले असून सदरचा आरोपी हा एक वर्षापुर्वी जबरी चोरीच्या केसमध्ये येरवडा कारागृह पुणे येथून शिक्षा भोगून आलेला आहे.

सदर कारवाई ही मा. रविन्द्र सेनगावकर अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे, मा. सुहास बावचे पोलीस उप आयुक्त सो, परि-१ पुणे शहर, मा. प्रदिप आफळे सहा.पोलीस आयुक्त सो, फरासखाना विभाग पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली राजेंन्द्र मोकाशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक,खडक पोलीस स्टेशन, पुणे. विजयकुमार शिंदे पोलीस निरीक्षक (गुन्हे),खडक पोलीस स्टेशन,पुणे.व तपास पथकातील उमाजी राठोड,स.पो.निरी., पोलीस कर्मचारी संदीप कांबळे,विशाल जाधव ,समीर माळवदकर,अमोल पाटेकर, बलतू घाडगे , श्रीखंडे यांनी सहभाग घेतला.